**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे. ४११००५**

**MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE DIVISIONAL BOARD, PUNE- 411 005**

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | E-MAIL - sscboardpune@gmail.com |
| --- | --- | --- |
| 25536722 (OFF) | 25536781/82/83 25536712 (OFF) | |


क्र.पुविमं/डीपी/जु.ऑ.२४/3994
पुणे. ४११००५
दि.२५/०७/२०२४

प्रति,

सर्व परिरक्षक, केंद्रसंचालक, मुख्याध्यापक व प्राचार्य,
जिल्हा - पुणे, अहमदनगर व सोलापूर.

विषय :- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) जुलै-ऑगस्ट २०२४ पुरवणी परीक्षेच्या वेळापत्रकातील बदलाबाबत..

संदर्भ :- राज्यमंडळ, पुणे यांचे जा.क्र.रा.मं./परीक्षा-६/२९१६ दि.२५/०७/२०१४ चे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, राज्यातील काही जिल्ह्यामध्ये दि.२६/०७/२०२४ रोजी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आलेला आहे त्यामुळे माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेतील दि.२६/०७/२०२४ रोजीच्या वेळापत्रकामध्ये बदल करण्यात आला आहे. तरी दि.२६/०७/२०२४ रोजीचे इ.१०वी पेपर दि.३१/०७/२०२४ रोजी व इ.१२वीचा पेपर दि.०९/०८/२०२४ रोजी रोजी घेण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी व याबाबत आपण आपल्या कार्यक्षेत्रातील परीक्षासंदर्भातील सर्व घटकांना अवगत करावे.

सोबत - वेळापत्रक बदलाबाबतचे प्रकटन

विभागीय सचिवांकरीता,
पुणे विभागीय मंडळ,पुणे.

प्रत - माहिती व कार्यवाहीस्तव -

१. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
२. शिक्षणाधिकारी(माध्य.), जिल्हा परिषद- पुणे, अहमदनगर व सोलापूर.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) जुलै—ऑगस्ट २०२४ पुरवणी परीक्षेच्या वेळापत्रकातील बदलाबाबत

## ॥ प्र क ट न ॥

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत जुलै—ऑगस्ट २०२४ मध्ये घेण्यात येणारी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) पुरवणी परीक्षा दि. १६/०७/२०२४ ते दि. ३०/०७/२०२४ आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पुरवणी परीक्षा दि. १६/०७/२०२४ ते दि. ०८/०८/२०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर परीक्षेचे वेळापत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले असून शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात आलेले आहे तथापि दि. २६/०७/२०२४ रोजी राज्याच्या काही जिल्हयांमध्ये अतिवृष्टीचा इशारा देण्यात आलेला आहे.

त्यामुळे दि. २६/०७/२०२४ रोजी होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेच्या वेळापत्रकामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) पुरवणी परीक्षा

| वेळापत्रकामध्ये निश्चित केलेला तपशील | वेळापत्रकाबाबत सुधारित तपशील |
|---|---|
| वार, दिनांक, सत्र, वेळ व विषय | वार, दिनांक, सत्र, वेळ व विषय |
| शुक्रवार दि. २६ जुलै, २०२४<br>सकाळ सत्र— ११.०० ते १.००<br>विषय— विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग२- (72-2) | बुधवार दि. ३१ जुलै, २०२४<br>सकाळ सत्र— ११.०० ते १.००<br>विषय— विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग२- (72-2) |

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पुरवणी परीक्षा

| वेळापत्रकामध्ये निश्चित केलेला तपशील | वेळापत्रकाबाबत सुधारित तपशील |
|---|---|
| वार, दिनांक, सत्र, वेळ व विषय | वार, दिनांक, सत्र, वेळ व विषय |
| शुक्रवार दि. २६ जुलै, २०२४<br>सकाळ सत्र— ११.०० ते २.००<br>विषय— वाणिज्य संघटन व व्यवस्थापन (51)<br>विषय— अन्नशास्त्र व तंत्रज्ञान (62)<br>विषय— एम.सी.व्ही.सी. पेपर—२—EB to XB=20 विषय | शुक्रवार दि. ०९ ऑगस्ट, २०२४<br>सकाळ सत्र— ११.०० ते २.००<br>विषय— वाणिज्य संघटन व व्यवस्थापन (51)<br>विषय— अन्नशास्त्र व तंत्रज्ञान (62)<br>विषय— एम.सी.व्ही.सी. पेपर—२—EB to XB=20 विषय |

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) पुरवणी परीक्षा जुलै—ऑगस्ट २०२४ लेखी व अन्य परीक्षेच्या उर्वरित वेळापत्रकामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. तरी वेळापत्रकातील उपरोक्त बदलाची सर्व संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, विद्यार्थी, पालक व अन्य घटक यांनी नोंद घ्यावी.

दिनांक—२५/०७/२०२४

(मेधा निरफराके)
सहसचिव,
राज्य मंडळ, पुणे—०४.